# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या ६१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि.२९ एप्रिल, २०१४ दुपारी ०१:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची ६१ वी बैठक मंगळवार, दि.२९ एप्रिल, २०१४ रोजी दुपारी ०१:०० वाजता** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरु महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | विभागीय सहसंचालिका, सोलापूर विभाग, सोलापूर | सदस्या |
| ३) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम., संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ४) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| ५) | प्राचार्य श्री. धुत्तरगाव एस. सी. | सदस्य |
| ६) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ७) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ८) | डॉ. कदम एस. डी. | सदस्य |
| ९) | डॉ. करचे बी. आर. | सदस्य |
| १०) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| ११) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १२) | सौ. मोहिते-पाटील पी. पी. | सदस्या |
| १३) | डॉ. लोणीकर एस. व्ही., प्र. परीक्षा नियंत्रक | सदस्य व कायम निमंत्रित |
| १४) | श्री. अनपट एस. बी. प्र. वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १५) | श्री. माळी एस. के., कुलसचिव | सचिव |

### स्वागतः

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

### अनुपस्थितीः

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस प्रा. डॉ. पाटील टी. आर. व डॉ. शिळीमकर टी. एन. यांनी दूरध्वनीद्वारे व डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. यांनी एस. एम. एस. द्वारे अनुपस्थिती कळविली. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली. अवर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, प्र. सहसंचालक (तं. शि.), तंत्र शिक्षण संचालक यांचे प्रतिनिधी हे सदस्य व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

**सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ ०१ ]** **दि.०३ मार्च, २०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

ठरावः **दि.०३ मार्च, २०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला व ठरावानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०२ ]** **दि.१८ मार्च, २०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठरावः** **दि.१८ मार्च, २०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला व ठरावानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

(टिपणीः महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

**ठरावः महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा. कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०४ ] विद्यापीठाच्या कार्यालयीन कामासाठी वाहनातून एकत्रित आलेल्या तीन सदस्यांना पूर्व परवानगीची अट शिथील करण्याबाबत.**

(टिपणी: विद्यापीठाच्या कार्यालयीन कामासाठी तीन सदस्य हे एकत्रित वाहनातून येत असतील तर त्यांना विद्यापीठाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. दि.१५ मार्च, २०१४ रोजी झालेल्या अधिसभेच्या बैठकीत अधिसभा सदस्य डॉ. रोंगे बी. पी. यांनी ठराव मांडण्यासाठी आपली खालीलप्रमाणे सूचना पाठविली आहे.

"विद्यापीठाच्या आदेश किंवा सुचनेनुसार विद्यापीठाच्या कामासाठी तीन लोक कार वापरणार असतील तर त्यांना त्यासाठी विद्यापीठाची पूर्व परवानगीची गरज असणार नाही अशी दुरुस्ती नियमात करावी अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

त्यावर खालील ठराव करण्यात आला.

| | |
|---|---|
| ठराव: | **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास श्री. गायकवाड एस. पी. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.** |

सबब, अधिसभेमध्ये झालेल्या ठरावानुसार विद्यापीठाच्या कामासाठी तीन लोक कार वापरणार असतील तर त्यांना विद्यापीठाची पूर्व परवानगीसाठीची अट रद्द करण्यास तसेच विद्यापीठात आल्यानंतर गेटपास देयकासोबत सादर करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव: पूर्वपरवानगीची अट रद्द करता येणार नाही. सदस्यांनी अशी पूर्वपरवानगी पत्र, एस.एम.एस, दूरध्वनी, फॅक्स किंवा ईमेलद्वारे घ्यावी असे सर्व सदस्यांना कळविण्याचे सर्वानुमते ठरले.**

**[ ०५ ] अधिसभेच्या दि.१५/०३/२०१४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये अधिसभा सदस्य डॉ.कोळेकर टी. एन. यांनी मांडलेल्या ठरावानुसार अधिसभेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: अधिसभेची आठवी बैठक दि.१५/०३/२०१४ रोजी विद्यापीठ सभागृहात झाली. या बैठकीत अधिसभा सदस्य डॉ. कोळेकर टी. एन. यांनी खालीलप्रमाणे ठराव / प्रस्ताव सादर केला होता.

**(९) अधिसभा सदस्य डॉ. कोळेकर टी. एन. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठवली आहे.**

हा अधिसभा व्यवस्थापन परिषदेस अशी शिफारस करते की, सोलापूर विद्यापीठ सोलापूर चे General Statute लवकरात लवकर अधिसभेच्या मान्यतेसाठी व मा.कुलपतींना मान्यतेची शिफारस करणेसाठी सादर करावे.

**ठराव: सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. अवताडे एच. के. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

वरीलप्रमाणे अधिसभेची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव: याबाबत परिनियम समितीने योग्य ती कार्यवाही लवकरात लवकर करावी असे परिनियम समितीस कळवावे असे सर्वानुमते ठरले.**

**[ ०६ ] अधिसभेच्या दि.१५/०३/२०१४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये अधिसभा सदस्य डॉ.कोळेकर टी. एन. यांनी मांडलेल्या ठरावानुसार अधिसभेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: अधिसभेची आठवी बैठक दि.१५/०३/२०१४ रोजी विद्यापीठ सभागृहात झाली. या बैठकीत अधिसभा सदस्य डॉ. कोळेकर टी. एन. यांनी खालीलप्रमाणे ठराव / प्रस्ताव सादर केला होता.

**(१०) अधिसभा सदस्य डॉ. कोळेकर टी. एन. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठवली आहे.**

ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस अशी शिफारस करते की, विद्यापीठाच्या मा.कुलगुरुंचे निवासस्थान व मा. कुलसचिव यांचे निवासस्थान विद्यापीठ परिसरात लवकरात लवकर बांधावे.

ठराव: **सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास श्री. गायकवाड आर. एस. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

वरीलप्रमाणे अधिसभेची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव: अधिसभेच्या दि.१५/०३/२०१४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये अधिसभा सदस्य डॉ.कोळेकर टी. एन. यांनी मांडलेल्या ठरावानुसार अधिसभेने व्यवस्थापन परिषदेस केलेली विद्यापीठ परिसरात मा. कुलगुरु व मा. कुलसचिव यांचे निवास बांधण्याची शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०७ ] अधिसभेच्या दि.१५/०३/२०१४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये अधिसभा सदस्य श्री. गायकवाड आर. एस यांनी मांडलेल्या ठरावानुसार अधिसभेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: अधिसभेची आठवी बैठक दि.१५/०३/२०१४ रोजी विद्यापीठ सभागृहात झाली. या बैठकीत अधिसभा सदस्य श्री. गायकवाड आर. एस. यांनी खालीलप्रमाणे ठराव / प्रस्ताव सादर केला होता.

**(१९) अधिसभा सदस्य श्री. गायकवाड आर. एस. यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठवली आहे.**

विद्यापीठातील विद्यार्थी व इतरांच्या सोयी साठी सोलापूर विद्यापीठाच्या परिक्षेत्रात अधिकृत बस थांबा सुरु करण्यासाठी ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस शिफारस करीत आहे.

**ठराव: सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. पवार एन. बी. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

वरीलप्रमाणे अधिसभेची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव: अधिसभेच्या दि.१५/०३/२०१४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये अधिसभा सदस्य श्री. गायकवाड आर. एस यांनी मांडलेल्या ठरावानुसार अधिसभेने व्यवस्थापन परिषदेस केलेली विद्यापीठासाठी अधिकृत बसथांबा करण्याची शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०८ ] सोलापूर विद्यापीठाच्या संलग्नित सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून बी.एड. पदवी मध्ये गुणानुक्रमे विद्यापीठात सर्वप्रथम येणाऱ्या स्नातकास प्रत्येक वर्षी "वै.रामचंद्र बाळकृष्ण बोधे अर्थात भाऊसाहेब बोधे सुवर्णपदक" देण्याकरिता तयार करण्यात आलेल्या नियमावलीचा मसुदा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: दि.१७/१२/२०१३ रोजीच्या पत्रान्वये डॉ. उर्मिला यशवंत बोधे, सोलापूर यांच्याकडून देणगी रक्कम रु.१,००,०००/- विद्यापीठास प्राप्त झाली आहे. त्यानुसार डॉ. उर्मिला यशवंत बोधे यांच्याकडून सुवर्णपदक देण्यासंदर्भात प्राप्त झालेला धनादेश स्विकारण्याबाबत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम १४ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरुमहोदयांनी दि.०४/०१/२०१४ रोजी दिलेल्या मान्यतेची दि.१५/०१/२०१४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये ठराव क्र.३ नुसार नोंद घेण्यात आली आहे.

सदर देणगीच्या व्याजातून सोलापूर विद्यापीठाच्या संलग्नित सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून बी.एड. पदवी मध्ये गुणानुक्रमे विद्यापीठात सर्वप्रथम येणाऱ्या स्नातकास प्रत्येक वर्षी "वै.रामचंद्र बाळकृष्ण बोधे अर्थात भाऊसाहेब बोधे सुवर्णपदक" या नावाने सुवर्णपदक देण्याकरिता नियमावलीचा मसुदा १) डॉ. लोणीकर एस. व्ही. २) ॲड. सलगर बी.एस. या समितीने तयार करुन दिलेला आहे.

सबब, शै.वर्ष २०१४-१५ पासून सोलापूर विद्यापीठाच्या संलग्नित सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून बी.एड. पदवी मध्ये गुणानुक्रमे विद्यापीठात सर्वप्रथम येणाऱ्या स्नातकास प्रत्येक वर्षी "वै.रामचंद्र बाळकृष्ण बोधे अर्थात भाऊसाहेब बोधे सुवर्णपदक" या नावाने सुवर्णपदक देण्याकरिता तयार करण्यात आलेल्या नियमावलीचा मसुदा विचारार्थ).

**ठराव: सोलापूर विद्यापीठाच्या संलग्नित सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून बी.एड. पदवी मध्ये गुणानुक्रमे विद्यापीठात सर्वप्रथम येणाऱ्या स्नातकास प्रत्येक वर्षी "वै.रामचंद्र बाळकृष्ण बोधे अर्थात भाऊसाहेब बोधे सुवर्णपदक" देण्याकरिता तयार करण्यात आलेल्या नियमावलीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०९ ] सोलापूर विद्यापीठाच्या संलग्नित सर्व महाविद्यालयातून अर्थशास्त्र विषय घेवून बी.ए. भाग- १ ते ३ मध्ये गुणानुक्रमे विद्यापीठात सर्वप्रथम येणाऱ्या स्नातकास प्रत्येक वर्षी "प्रा.जी. एस. हारकुड अक्कलकोट सुवर्णपदक" देण्याकरिता तयार करण्यात आलेल्या नियमावलीचा मसुदा विचारार्थ.**

(टिपणी: दि.२६/१२/२०१३ रोजीच्या पत्रान्वये प्रा.जी. एस. हारकुड, अक्कलकोट यांच्याकडून देणगी रक्कम रु.१,००,०००/- विद्यापीठास प्राप्त झाली आहे. त्यानुसार प्रा.जी.एस.हारकुड यांच्याकडून सुवर्णपदक देण्यासंदर्भात प्राप्त झालेला धनादेश स्विकारण्याबाबत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम १४ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा.कुलगुरुमहोदयांनी दि.३१/१२/२०१३ रोजी दिलेल्या मान्यतेची दि.१५/०१/२०१४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये ठराव क्र.२ नुसार नोंद घेण्यात आली आहे.

सदर देणगीच्या व्याजातून सोलापूर विद्यापीठाच्या संलग्नित सर्व महाविद्यालयातून अर्थशास्त्र विषय घेवून बी.ए. भाग- १ ते ३ मध्ये गुणानुक्रमे विद्यापीठात सर्वप्रथम येणाऱ्या स्नातकास प्रत्येक वर्षी "प्रा.जी.एस.हारकुड अक्कलकोट सुवर्णपदक" या नावाने सुवर्णपदक देण्याकरिता नियमावलीचा मसुदा १) डॉ. लोणीकर एस. व्ही. २) ॲड. सलगर बी. एस. या समितीने तयार करुन दिलेला आहे.

सबब, शै.वर्ष २०१४-१५ पासून सोलापूर विद्यापीठाच्या संलग्नित सर्व महाविद्यालयातून अर्थशास्त्र विषय घेवून बी.ए. भाग- १ ते ३ मध्ये गुणानुक्रमे विद्यापीठात सर्वप्रथम येणाऱ्या स्नातकास प्रत्येक वर्षी "प्रा.जी.एस.हारकुड अक्कलकोट सुवर्णपदक" या नावाने सुवर्णपदक देण्याकरिता तयार करण्यात आलेल्या नियमावलीचा मसुदा विचारार्थ).

**ठराव: सोलापूर विद्यापीठाच्या संलग्नित सर्व महाविद्यालयातून अर्थशास्त्र विषय घेवून बी.ए. भाग- १ ते ३ मध्ये गुणानुक्रमे विद्यापीठात सर्वप्रथम येणाऱ्या स्नातकास प्रत्येक वर्षी "प्रा.जी. एस. हारकुड अक्कलकोट सुवर्णपदक" देण्याकरिता तयार करण्यात आलेल्या नियमावलीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १० ] राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्ट, सोलापूर जिल्हा सोलापूर यांनी परत पाठविलेली रु.५०,०००/- इतकी मदत निधी स्विकारण्याची आणि ती रक्कम गारपीटीमुळे ग्रस्त झालेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कासाठी वापरण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: सोलापूर जिल्हयातील दुष्काळग्रस्त भागातील विद्यापीठामध्ये पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांस रु.२०००/- प्रमाणे एकूण १४६ विद्यार्थ्यांसाठी रु.२,९२,०००/- इतका निधी विद्यापीठास दि.३० ऑक्टोबर २०१३ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाला होता. सदरचा निधी जमा करुन संबंधित विद्यार्थ्यांना धनादेशाद्वारे वाटप करण्यास व त्या संदर्भातील विषय व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्यास दि.०१/१०/२०१३ रोजी कार्यालयीन टिपणीन्वये मा.कुलगुरुमहोदयांनी मान्यता दिली होती. मान्य टिपणीच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीची बाब दिनांक २९ ऑक्टोबर २०१३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेसमोर विषय क्र.१० अन्वये माहितीस्तव सादर करुन केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. सदरच्या १४६ विद्यार्थ्यांपैकी १२१ विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु.२०००/- प्रमाणे रु.२,४२,०००/- इतकी रक्कम वाटप करण्यात आली व उर्वरित २५ विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण करुन गेल्यामुळे त्यांचा संपर्क होत नसल्याने संबंधित विद्यार्थ्यांची अखर्चित शिल्लक रक्कम रु.५०,०००/- इतकी राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्ट यांना परत पाठवून दिली होती.

वरील प्रमाणे परत पाठविण्यात आलेली अखर्चित रु.५०,०००/- ची रक्कम राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्ट, सोलापूर यांनी पुनश्चः विद्यापीठास पाठवून दिली असून, सदरची रक्कम गारपीटीमुळे ग्रस्त झालेल्या व शशिकांत पाटील सारख्या गरजू विद्यार्थ्यास वाटप करण्यासाठी सुचविले आहे.

सबब, वरील रु.५०,०००/- चा धनाकर्ष स्विकारुन विद्यापीठ परिसरातील संकुलात शिक्षण घेत असलेल्या गरजू व गारपीटीमुळे ग्रस्त विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी मान्यतेस्तव सादर).

**ठराव: राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्ट, सोलापूर जिल्हा सोलापूर यांनी परत पाठविलेली रु.५०,०००/- इतकी मदत निधी स्विकारुन ही रक्कम गारपीटीमुळे ग्रस्त झालेल्या व शशिकांत पाटील सारख्या गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कासाठी वापरण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ११ ] प्रस्तुत विद्यापीठातील श्री. एस. एस. बंडगर यांना वाहनचालक या पदावरुन कनिष्ठ लिपिक या पदावर पदोन्नती देण्यात आलेली असल्याने, पदोन्नती ऐवजी पदनामात (संवर्गात) बदल असल्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: दि.१२/१२/२०११ रोजीच्या विभागीय पदोन्नती समितीच्या अहवालास मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम १४(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली बाब व्यवस्थापन परिषदेच्या दि.१२/०१/२०१२ रोजीच्या बैठकीत माहितीस्तव ठेवण्यात आली होती. सदरील विभागीय पदोन्नती समितीने श्री. एस.एस. बंडगर वाहनचालक यांच्या नावासमोर खालीलप्रमाणे शिफारस केलेली आहे.

*" खुल्या प्रवर्गासाठी रिक्त असलेल्या कनिष्ठ लिपीक या पदासाठी श्री. बंडगर एस.एस., वाहनचालक (मूळ प्रवर्ग : भज-क) यांची कनिष्ठ लिपीक या पदावर सेवाजेष्ठतेनुसार खुल्या प्रवार्गातून, दोन्ही पदाच्या वेतनश्रेणीतील वेतन व ग्रेडवेतन एकच असल्याने पदनामात बदल करुन (वर्ग ४ मधून वर्ग ३ मध्ये) कनिष्ठ लिपिक या पदावर पदोन्नतीस शिफारस करण्यात येत आहे."*

उक्त शिफारशीच्या अनुषंगाने श्री. एस. एस. बंडगर वाहनचालक यांना विद्यापीठ कार्यालयाचे आदेश क्र.SUS/Estt/2011-12/8503, दि.२६/१२/२०११ अन्वये कनिष्ठ लिपिक पदावर पदोन्नतीचे आदेश देण्यात आले होते. त्यानुषंगाने श्री. एस. एस. बंडगर यांच्या वेतननिश्चितीस मान्यता मिळणेकामी मा.विभागीय सहसंचालक कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केला असता, संबंधितांना देण्यात आलेल्या पदोन्नतीच्या आदेशात व विभागीय पदोन्नतीच्या शिफारशीत तफावत असल्याने मान्यता मिळालेली नाही.

वास्तविक सदरची पदोन्नती नसून संबंधित कर्मचाऱ्याच्या पदनामात (संवर्गात) बदल आहे. विभागीय पदोन्नती समितीच्या अहवालात दोन्ही पदाच्या वेतनश्रेणीतील वेतन एकच असल्याने पदनामात बदल केल्याचा उल्लेख आहे. मात्र कार्यालयीन आदेशामध्ये केवळ पदोन्नतीचा उल्लेख आहे.

सबब, श्री. एस. एस. बंडगर यांना देण्यात आलेल्या आदेशात पदोन्नतीचा उल्लेख करण्यात आलेला असून त्याऐवजी पदनामात (संवर्गात) बदल असल्याचे समजण्यात यावे, अशा आशयाचे आदेश तयार करुन त्यास विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांची मान्यता घेण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: प्रस्तुत विद्यापीठातील श्री. एस. एस. बंडगर यांना वाहनचालक या पदावरुन कनिष्ठ लिपिक या पदावर पदनामात बदल करुन नेमणूक देण्यात आलेली असल्याने, पदोन्नती ऐवजी पदनामात (संवर्गात) बदल असल्याचे समजण्यात यावे, अशा आशयाचे आदेश तयार करुन त्यास विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांची मान्यता घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १२ ] महाराष्ट्र राज्यतील ओला दुष्काळ व गारपीठग्रस्तांना मदत म्हणून विद्यापीठातील सर्व संवैधानिक अधिकारी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्या माहे एप्रिल, २०१४ च्या वेतनातून एक दिवसाचे वेतन मा. मुख्यमंत्री, सहायता निधीमध्ये देणगी म्हणून उपलब्ध करुन देण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणीः महाराष्ट्रातील काही भागात ओल्या दुष्काळाची परिस्थिती व मोठ्या प्रमाणावर झालेल्या गारपिटमुळे शेतमालाचे व पशुधनाचे मोठे नुकसान झाले आहे. सदर संकटग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याकरिता विद्यापीठातील सर्व संवैधानिक अधिकारी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्या माहे एप्रिल, २०१४ च्या वेतनातून एक दिवसाचे वेतन (मूळ वेतन + ग्रेड पे + महागाई भत्ता) मा. मुख्यमंत्री, सहायता निधीमध्ये देणगी म्हणून उपलब्ध करुन देण्याबाबतचे दि.१०/०४/२०१४ व दि.१७/०४/२०१४ रोजीचे शासन परिपत्रक प्राप्त झाले आहे.

सबब, महाराष्ट्र राज्यातील ओला दुष्काळ व गारपीठग्रस्तांना मदत म्हणून विद्यापीठातील सर्व संवैधानिक अधिकारी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्या माहे एप्रिल, २०१४ च्या वेतनातून एक दिवसाचे वेतन मा.मुख्यमंत्री, सहायता निधीमध्ये देणगी म्हणून उपलब्ध करुन देण्याची बाब विचारार्थ).

**ठरावः महाराष्ट्र राज्यातील ओला दुष्काळ व गारपीठग्रस्तांना मदत म्हणून विद्यापीठातील सर्व संवैधानिक अधिकारी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्या माहे एप्रिल, २०१४ च्या वेतनातून एक दिवसाचे वेतन (मूळ वेतन + ग्रेड पे + महागाई भत्ता) कपात करुन मा. मुख्यमंत्री, सहायता निधीमध्ये देणगी म्हणून देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १३ ] व्यवस्थापन परिषदेच्या दि.०३/०३/२०१४ रोजी श्री. महेश दिगंबर पवार यांच्या अपीलातील निर्णयास अनुसरुन ठराव क्र.४ (९) नुसार मा.उच्च न्यायालय मुंबई येथील विद्यापीठाचे पॅनल ॲडव्होकेट श्री. पी. एन. जोशी यांच्याकडून प्राप्त झालेले अभिप्राय विचारार्थ सादर.**

(टिपणी: श्री. महेश दिगंबर पवार (वाहनचालक खुला वर्ग) यांना विद्यापीठाने मा. उच्च न्यायालयातील LPA No. ५१/२०११ मधील आदेशास अनुसरुन कार्यमुक्त केलेले आहे. सदर आदेशाविरुध्द श्री. महेश दिगंबर पवार यांना मा. पिठासन अधिकारी, महाविद्यालय व विद्यापीठ न्यायाधिकरण पुणे यांच्याकडे अपील क्र.७/२०१३ ची दाखल केलेली होती.

सदर अपीलातील निर्णयानुसार श्री. महेश दिगंबर पवार यांनी, त्यांना विद्यापीठात श्री. शिरीष बंडगर यांची पदोन्नती झाल्याने रिक्त असलेल्या वाहनचालक या पदावर रुजू करुन घेण्याबाबत विद्यापीठास दि.१४/०२/२०१४ रोजी अर्ज सादर केलेला आहे. परंतू श्री. शिरीष बंडगर कार्यरत असलेल्या कनिष्ठ लिपिक या पदाची वेतननिश्चिती ही मा. विभागीय सहसंचालक यांच्याकडून अद्याप झालेली नाही.

त्यामुळे सदरचा अर्ज व अपील क्र.७/२०१३ मधील आदेशाची प्रत व्यवस्थापन परिषदेच्या दि.०३/०३/२०१४ रोजीच्या बैठकीत ठेवली असता, याबाबत मा.उच्च न्यायालयातील वकीलांचा अभिप्राय घेऊन हा विषय पुनश्चः सादर करण्याबाबत विषय ४ (९) वर ठराव पारित करण्यात आला. त्यानुसार दि.१३/०३/२०१४ रोजी मा.उच्च न्यायालयातील विद्यापीठाचे पॅनल ॲडव्होकेट श्री. पी. एन. जोशी यांना पत्र पाठविण्यात आले. त्यानुसार विद्यापीठास अभिप्राय प्राप्त झालेला आहे.

याबाबत अभिप्राय देताना ॲड. श्री. पी. एन. जोशी यांनी खालीलप्रमाणे कळविले आहे.

१) अपील क्र.७/२०१३ मधील आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालय येथे याचिका (Writ) दाखल करता येईल.

२) श्री. महेश दिगंबर पवार यांना न्यायधिकरणाच्या आदेशानुसार Conditional नियुक्ती आदेश देता येईल व त्यात जर बंडगर शिरीष यांची कनिष्ठ लिपिक या पदाची वेतन निश्चिती न झाल्यास त्यांची नियुक्ती संपुष्टात येईल अशा स्वरुपाच्या आदेशान्वये संबंधीतांना सेवेत रुजू करुन घेण्यात येईल.

सदर अभिप्रायाची प्रत सोबत जोडलेली आहे. सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयार्थ सादर).

**ठराव: श्री. महेश दिगंबर पवार यांच्या अपीलातील निर्णयास अनुसरुन व्यवस्थापन परिषदेच्या दि.०३/०३/२०१४ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.४ (९) नुसार मा.उच्च न्यायालय मुंबई येथील विद्यापीठाचे पॅनल ॲडव्होकेट श्री. पी. एन. जोशी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायानुसार अपील क्र.७/२०१३ मधील आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालय येथे याचिका (Writ) दाखल करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १४ ] श्री. सुशांत कुलकर्णी यांचे दि.२८/०२/२०१४ रोजी प्राप्त झालेले पत्र विचारार्थ.**

(टिपणी: श्री. सुशांत कुलकर्णी यांनी दि.२८/०२/२०१४ रोजी पत्रानुसार, खालील मुद्दयांवर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत विनंती केली आहे.

१) कॉमर्स शाखेच्या पी.एच.डी. प्रबंध सादर झालेले आहेत. डॉ. शेख व डॉ. बारबोले 'आग्रा' व 'अलीगड' विद्यापीठाची संस्कृती येथे आणत आहेत त्याला प्रतिबंध घालण्याची गरज आहे. कॉमर्स शाखेच्या सादर झालेले प्रबंध ईतर विद्यापीठाच्या तज्ञाकडून तपासनू घेऊनच त्यावर रेफ्री नेमण्याचा विचार करावा हि विनंती कारण एका प्रबंधात सुचविलेल्या दुरुस्त्या व्यवस्थीत केलेल्या नाहीत तर दुसऱ्या ही प्रबंधात कसल्याही प्रकारच्या दुरुस्त्या न करता सादर केल्याचे खलील करित्या समजते. विद्यापीठाची गुणवत्ता राखण्यासाठी संशोधन चांगल्या दर्जाचे असणे आवश्यक आहे. त्यामूळे आपण योग्य ती कार्यवाही करावी.

२) सुटाचे काही सदस्य कार न आणता किंवा इतरांच्या कारमधून येऊन कारचे बील घेत आहेत. कृपया सदरचे बील देताना कार आणल्याची खात्री करुनच कारचे बील अदा करावे. ज्यामुळे विद्यापीठाच्या पैशाचा योग्य वापर होऊ शकेल.

३) प्रा. शिळीमकर (अकलूज), प्रा. पवार (मंगळवेढा) व प्रा. शेख (माढा) यांची बीले चेक करण्याची आवश्यकता असून कृपया योग्य ती कार्यवाही व्हावी" अशी विनंती केलेली आहे.

सबब, श्री. सुशांत कुलकर्णी यांचे पत्र विचारार्थ).

**ठराव:** **श्री. सुशांत कुलकर्णी यांच्या दि.२८/०२/२०१४ रोजीच्या पत्राबाबत शहानिशा करुन सदरचे पत्र दप्तरी दाखल करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच यापुढे अशा प्रकारची पत्रे प्रशासकीय स्तरावरुन शहानिशा केल्याशिवाय व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्यात येवू नयेत असे ठरले.**

**[ १५ ] दि.३० ऑक्टोबर, २०१३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र.६(२) नुसार परीक्षा विभागास आवश्यक असलेल्या DATA CENTER ची सेवा दि.२२/१०/२०१३ ते दि.२१/०५/२०१४ अशी सहा महिने मुदतवाढ घेण्यात आलेली आहे. सबब, आणखी सहा महिने मुदतवाढ देण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: परीक्षा विभागास आवश्यक असणारे DATA CENTER ची सेवा दि.३० ऑक्टोबर, २०१३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र.६(२) च्या मान्यतेस अनुसरुन M/s. Grace Works Information Systems, Mumbai या फर्मकडून रु.४०,०००/- प्रतिमहिना तसेच DATA CENTER साठी लागणाऱ्या सर्व सुविधा व २ Core ऐवजी ४ Core आणि ८ GB RAM सह सहा महिने मुदतवाढीने भाडेतत्वावर घेण्यात आले होते. सदर सेवा पुरविण्याची मुदत दि.२१/०५/२०१४ रोजी संपणार आहे.

सबब, विभागाकडील कामाकरिता सदर DATA CENTER आणखी सहा महिने भाडेतत्वावर घेण्यासाठी दि.०४/०५/२०१४ रोजीच्या टिपणीस प्रशासकीय मान्यता दिलेली असून स्वतंत्र Server खरेदीची प्रक्रिया सुरु करण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे. सदर DATA CENTER ची भाडेतत्वावर सेवा घेण्यासाठी आणखी सहा महिने मुदतवाढ घेणे गरजेचे आहे. वरील कामासाठी सहा महिन्यासाठी रु.२,४०,०००/- इतका खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च विभागाकडील खालील अंदाजपत्रकीय शिर्षकातून खर्ची टाकावा लागणार आहे.

| Budget Head | Data Center Rent |
|---|---|
| Provision | ५,००,०००/- |
| Expenditure | Nil |
| Balance | ५,००,०००/- |

उपरोक्त फर्मकडून DATA CENTER भाडेतत्वावर घेण्यासाठी सहा महिन्याची मुदतवाढ घेण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: परीक्षा विभागास आवश्यक असलेल्या DATA CENTER ची सेवा आणखी सहा महिने म्हणजे दि.२०/११/२०१४ पर्यंत M/s. Grace Works Information Systems, Mumbai या फर्मकडून रु.४०,०००/- प्रतिमहिना तसेच DATA CENTER साठी लागणाऱ्या सर्व सुविधा व २ Core ऐवजी ४ Core आणि ८ GB RAM सह मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**दरम्यानच्या कालावधीत विद्यापीठाचे स्वतःचे DATA CENTER उभे करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.**

**[ १६ ] विद्यापीठ परीक्षांच्या उत्तरपत्रिका तपासणीसाठी सुट्टयांच्या कालावधीत (Vacation) जर परीक्षक मध्यवर्ती मुल्यमापन केंद्राकडे उत्तरपत्रिका तपासणीसाठी येत असतील तर त्यांना त्या दिवसाचा स्थानिक भत्ता (Local Conveyance Allowance) देय होण्याबाबतची परीक्षा मंडळाची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: परीक्षा मंडळाच्या तातडीच्या बैठकीत चर्चा होत असताना काही सदस्यांनी विद्यापीठीय परीक्षांचे निकाल वेळेत जाहिर करण्याच्या उद्देशाने व परीक्षक व परिनिरीक्षक यांना प्रोत्साहित करण्यासाठी काही उपाय योजना करता येतील का याचा उहापोह होवून सविस्तर चर्चा झाली. तसेच विद्यापीठ परीक्षांच्या उत्तरपत्रिका तपासणीसाठी सुट्टयांच्या कालावधीत (Vacation) जर परीक्षक मध्यवर्ती मुल्यमापन केंद्राकडे उत्तरपत्रिका तपासणीसाठी येत असतील तर त्यांना त्या दिवसाचा स्थानिक भत्ता (Local Conveyance Allowance) दिला जात नाही. सबब सदर कालावधीत (Vacation) परीक्षकांना व परिनिरीक्षकांना स्थानिक भत्ता (Local Conveyance Allowance) देण्याबाबतची शिफारस करावी अशी विनंती काही सन्माननीय सदस्यांनी केली. यास अनुसरुन आयत्या वेळेचा विषय म्हणून धोरणात्मक निर्णयासाठीची बाब परीक्षा मंडळाच्या दि.१८ मार्च, २०१४ रोजीच्या तातडीच्या बैठकीत विचारार्थ ठेवली असता खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

| | |
|---|---|
| **ठरावः** | **विद्यापीठ परीक्षांच्या उत्तरपत्रिका तपासणीसाठी सुटटयांच्या कालावधीत (Vacation) जर परीक्षक म.मुल्यमापन केंद्राकडे येत असतील तर त्यांना त्या दिवसाचा स्थानिक भत्ता (Local Conveyance Allowance) देय होणेबाबतची बाबतची शिफारस व्यवस्थापन परिषदेस करित आहे.** |

विद्यापीठ परीक्षांच्या उत्तरपत्रिका तपासणीसाठी सुट्ट्यांच्या कालावधीत (Vacation) जर परीक्षक मध्यवर्ती मुल्यमापन केंद्राकडे उत्तरपत्रिका तपासणीसाठी येत असतील तर त्यांना त्या दिवसाचा स्थानिक भत्ता (Local Conveyance Allowance) देय होण्याबाबतची परीक्षा मंडळाची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठरावः विद्यापीठ परीक्षांच्या उत्तरपत्रिका तपासणीसाठी सुट्टयांच्या कालावधीत (Vacation) जर परीक्षक मध्यवर्ती मुल्यमापन केंद्राकडे उत्तरपत्रिका तपासणीसाठी येत असतील तर त्यांना त्या दिवसाचा स्थानिक भत्ता (Local Conveyance Allowance) देय होण्याबाबतची परीक्षा मंडळाची शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १७ ] मा. शाखा व्यवस्थापक, सेंट्रल बॅक ऑफ इंडिया शाखा कोंडी यांनी दि.२४/०३/२०१४ रोजी मुदत ठेवी ठेवणेबाबत दिलेले पत्र विचारार्थ.**

(टिपणीः सेंट्रल बॅक ऑफ इंडिया शाखा कोंडी, सोलापूर यांचे शाखा व्यवस्थापक यांनी दि.२४/०३/२०१४ रोजीच्या पत्रान्वये बॅकेचे डी. डी. / आर. टी. जी. एस. व इतर शुल्क माफ केल्यामुळे तसेच विद्यापीठातील कर्मचाऱ्यांसाठी कर्ज योजना दिल्यामुळे मुदत ठेवी मिळणेबाबत विनंती केली आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७५(२) (ii) नुसार विद्यापीठाकडे प्राप्त झालेल्या देणग्या / शिल्लक निधी इत्यादी बाबतचा गुंतवणूक आराखडा समान लेखासंहिता मधील तरतूद १.६८ नुसार करण्याकरिता मा. कुलगुरु नियुक्ती समितीने दि.११/०९/२०१२ रोजी सभा घेवून खालीलप्रमाणे ठराव केला आहे.

१. मान्यतेनुसार महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील तरतूद १०२(७) मध्ये नमूद केल्याप्रमाणे गुंतवणकीबाबत कार्यवाही करणे.
२. गुंतवणूकीची सर्व कार्यवाही समान लेखा संहितेमधील तरतूद क्र.१.७२ प्रमाणे करणे.

समितीने दिलेल्या शिफारशीस दि.०९/१०/२०१२ रोजी वित्त व लेखा समितीच्या मान्यतेच्या शिफारशीने दि.१६/१०/२०१२ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये प्रस्ताव विचारार्थ सादर केला असता त्यास ठराव क्र.१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सोबत ठरावाची प्रत आवलोकनार्थ सादर.

व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिलेल्या आरखड्याप्रमाणे शिल्लक निधीची नवीन गुंतवणूक तसेच गुंतवणूक केलेल्या ठेवीची मुदत संपल्यानंतर पुर्नगुंतवणूक (मुदत ठेवीच जी बँक जादा बँक व्याज देते त्यास) समान लेखा संहितेमधील तरतूद क्र.१.७२ अन्वये वित्त व लेखा अधिकारी यांनी सादर केल्यानुसार मा. कुलगुरु यांच्या मान्यतेने करण्यात येते.

सबब, सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा कोंडी, सोलापूर यांनी मुदत ठेवी ठेवणे बद्दल दिलेले पत्र व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठरावः सदरचा विषय अमान्य करण्यात आला.**

**[ १८ ] सामाजिकशास्त्रे संकुलाचे संचालक, डॉ. ई. एन. अशोककुमार यांना हेलसिंकी, फिनलँड येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेस उपस्थित राहण्याकरिता अर्थसहाय्य मिळण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: व्यवस्थापन परिषेच्या दि.३१/०८/२०१३ रोजीच्या बैठकीतील आयत्या वेळेचा विषय क्र.२२(७) वरील ठरावानुसार सोलापूर विद्यापीठ (सामाजिकशास्त्रे संकुल) व युनिव्हर्सिटी ऑफ तुर्को, फिनलँड यांच्यासमवेत सामजंस्य करार करण्यात आला या करारामुळे Exchange Programme अंतर्गत सामाजिकशास्त्रे संकुल व युनिव्हर्सिटी ऑफ तुर्को, फिनलँड या दोन्ही विद्यापीठातील संशोधक, शिक्षक, विद्यार्थी यांना संद्यस्थितीत सामाजिकशास्त्रे अंतर्गत संशोधन वृध्दिंगत होवून त्याचा लाभ होणार आहे. Finland Futures Research Center (FFRC), Turku, Finland यांनी (Sustainable Futers in a Changing Climate) या विषयावर जून २०१४ मध्ये Helsinki येथे आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. FFRC च्या सोबत मार्गदर्शनानुसार Center for Rural Development and Foresight Studies हे केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. यासंदर्भात अधिकची माहिती मिळावी व हे केंद्र चालू करण्यासाठी तज्ञांचे सहकार्य मिळावे या बाबीचा विचार करता डॉ. ई. एन. अशोककुमार "Forests for Carbon Sinks: Some Plausible, Probable and Desirables for India" या विषयाचा संशोधन प्रबंध पेपर सादर करणार आहेत. याकरिता उक्त ठिकाणी जाण्यासाठी आणि संशोधनाला चालना मिळावी याकरिता विद्यापीठाकडून डॉ. ई. एन. अशोककुमार यांना अर्थसहाय्य मिळण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: आंतरराष्ट्रीय परिषदांना उपस्थित राहणाऱ्या विद्यापीठाच्या शिक्षकांना अर्थसहाय्य देण्यासाठी नियमावली तयार करावी. दरम्यानच्या कालावधीत सामाजिकशास्त्रे संकुलाचे संचालक, डॉ. ई. एन. अशोककुमार यांना हेलसिंकी, फिनलँड येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेस उपस्थित राहण्याकरिता प्रत्यक्ष प्रवास खर्चाच्या ५०% किंवा रु.३०,०००/- यापैकी जे कमी असेल इतके अर्थसहाय्य देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १९ ] संलग्नित महाविद्यालयाकडील विद्यापीठ विहित निवड समिती मार्फत निवड झालेल्या व विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एका महाविद्यालयातून दुसऱ्या महाविद्यालयात बदली होऊन व पदनामात बदल झालेले चेंजिस इन स्टाफच्या प्रस्तावावर, सोबतच्या तक्यातील चेंजिस इन स्टाफच्या समितीने केलेल्या शिफारशी दंडक ६५ अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणीः संलग्नित महाविद्यालयाकडील शिक्षकांना चेंजिस इन स्टाफ मान्यता देण्यासाठी दंडक ५९ प्रमाणे गठीत केलेल्या समितीची बैठक दि.११/०३/२०१४ रोजी प्रस्तुत विद्यापीठात पार पडली आहे. सदर बैठकीत संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांकडून प्राप्त झालेल्या चेंजिस इन स्टाफच्या प्रस्तावावर चेंजिस इन स्टाफच्या समितीने केलेल्या शिफारशी सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे आहेत. सदरील शिफारशींना दंडक ६५ अन्वये व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. यास्तव चेंजिस इन स्टाफ समितीच्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठरावः संलग्नित महाविद्यालयाकडील विद्यापीठ विहित निवड समिती मार्फत निवड झालेल्या व विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एका महाविद्यालयातून दुसऱ्या महाविद्यालयात बदली होऊन व पदनामात बदल झालेले चेंजिस इन स्टाफच्या प्रस्तावावर, तक्त्यातील चेंजेस इन स्टाफच्या समितीने केलेल्या शिफारशी दंडक ६५ अन्वये स्विकारुन त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ २० ] शै.वर्ष २०१४-१५ पासून नोंदणीकृत संस्थेकडून / संलग्नित महाविद्यालयांकडून नवीन पारंपारिक महाविद्यालय, विषय / अभ्यासक्रम, अतिरीक्त तुकडी व विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्राप्त प्रस्तावावर शासन निर्णय क्र. एनजीसी २०१०/ (१९३ / १०) मशि ४ दि.३०.१०.२०१०, शासन निर्णय क्र. एनजीसी २०११ / (२४० /११) मशि ४ दि.२५.१०.२०११ व शासन निर्णय क्र. एनजीसी २०१२ / (२४७/१२) मशि ४ दि.०२/०९/२०१३ नुसार केलेली कार्यवाही माहितीस्तव व म.वि.कायदा १९९४ कलम ८२ (४) नुसार सदरचे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याची बाब मान्यतेस्तव.**

(टिपणी: शै.वर्ष २०१४-१५ पासून विद्यापीठाकडे सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे नोंदणीकृत संस्थाकडून / संलग्नित महाविद्यालयांकडून पारंपारिक नवीन महाविद्यालय / विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त तुकडी / विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

सदर प्राप्त प्रस्तावांवर महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एनजीसी २०१० / (१९३ / १०) मशि ४ दि.३०.१०.२०१०, शासन निर्णय क्र. एनजीसी २०११ / (२४० / ११) मशि ४ दि.२५.१०.२०११ व शासन निर्णय क्र. एनजीसी २०१२ / (२४७/१२) मशि ४ दि.०२/०९/२०१३ नुसार कार्यवाही पूर्ण केलेली आहे.

तसेच उपरोक्त शासन निर्णयास अनुसरुन शै.वर्ष २०१४-१५ पासून नोंदणीकृत संस्थेकडून व संलग्नित महाविद्यालयांकडून पारंपारिक अभ्यासक्रमातंर्गत येणाऱ्या नवीन महाविद्यालय / विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त तुकडी / अतिरीक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता / विद्याशाखा सुरु करण्यास्तव प्राप्त झालेल्या प्रस्तावावर मा.कुलगुरु महोदय यांनी सोबत जोडल्या प्रमाणे केलेली कार्यवाही दि.२१.०४.२०१४ रोजीच्या महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या सभेसमारे विषय क्र.७ अन्वये माहितीस्तव सादर करण्यात आली असता, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने ठराव क्र.७ अन्वये उपरोक्त शासन निर्णयानुसार मा.कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आलेली आहे.

सबब, शै.वर्ष २०१४-१५ पासून नोंदणीकृत संस्थेकडून / संलग्नित महाविद्यालयांकडून नवीन पारंपारिक महाविद्यालय, विषय / अभ्यासक्रम, अतिरीक्त तुकडी व विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्राप्त प्रस्तावावर शासन निर्णय क्र.एनजीसी २०१०/(१९३/१०) मशि ४ दि.३०.१०.२०१०, शासन निर्णय क्र.एनजीसी २०११/(२४०/११) मशि ४ दि.२५.१०.२०११ व शासन निर्णय क्र. एनजीसी २०१२ / (२४७/१२) मशि ४ दि.०२/०९/२०१३ नुसार केलेली कार्यवाही माहितीस्तव व म.वि.कायदा १९९४ कलम ८२ (४) नुसार सदरचे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याची बाब मान्यतेस्तव सादर).

**ठराव: शै.वर्ष २०१४-१५ पासून नोंदणीकृत संस्थेकडून/संलग्नित महाविद्यालयांकडून नवीन पारंपारिक महाविद्यालय, विषय/अभ्यासक्रम, अतिरीक्त तुकडी व विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्राप्त प्रस्तावावर शासन निर्णय क्र. एनजीसी २०१०/(१९३/१०) मशि ४, दि.३०/१०/१०, शासन निर्णय क्र. एनजीसी २०११/(२४०/११) मशि ४, दि.२५/१०/११ व शासन निर्णय क्र. एनजीसी २०१२/(२४७/१२) मशि ४, दि.०२/०९/१३ नुसार केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली व महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ८२ (४) नुसार पदार्थविज्ञान आणि रसायनशास्त्राचे पदव्युत्तर अभ्यासक्रम वगळता इतर अभ्यासक्रमासाठी बी.सी.यु.डी. ने केलेल्या शिफारशी मान्य करुन शासनास प्रस्ताव पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ २१ ] सामाजिक शास्त्रे संकुलातील A.I.H.C.&.A या विभागामार्फत चालविले जाणारे P.G.Diploma in Museology व P.G.Diploma in Tourism हे दोन्ही अभ्यासक्रम स्थगित करण्याबाबत मा.संचालक, सामाजिक शास्त्रे संकुल, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांनी सादर केलेले पत्र विचारार्थ.**

(टिपणी: दि.०२/०४/२०१४ रोजीच्या पत्रामध्ये संचालक, सामाजिक शास्त्रे संकुल यांनी प्रस्तुत विद्यापीठामध्ये सामाजिक शास्त्रे संकुलातील A.I.H.C.&.A या विभागामार्फत चालविले जाणारे P.G.Diploma in Museology व P.G.Diploma in Tourism या दोन्ही अभ्यासक्रमाना विद्यार्थ्यांचा अत्यल्प प्रतिसाद मिळत असल्यामुळे तसेच जे विद्यार्थी प्रवेश घेतात त्यामध्ये जिल्हयाच्या बाहेरील विद्यार्थी असतात त्यामुळे ते विद्यार्थी नियमीत हजर नसतात. तसेच सदरच्या अभ्यासक्रमासाठी अतिरिक्त शिक्षकांची उपलब्धता नसल्याने सातत्याने अडचणी निर्माण होत आहेत असे कळविलेले आहे.

उक्त वस्तुस्थिती विचारार्थ घेता सामाजिक शास्त्रे संकुलामार्फत दि.०१/०४/२०१४ रोजीच्या टिपणीद्वारे P.G.Diploma in Museology व P.G.Diploma in Tourism या अभ्यासक्रमाकरीता अतिरिक्त शिक्षक उपलब्ध होईपर्यंत हे दोन्ही अभ्यासक्रम स्थगित करण्यासंबधी टिपणी सादर केली असता मा.कुलगुरुमहोदय यांनी सदरचा विषय हा आगामी विद्यापरिषदेसमोर ठेवण्यास मान्यता दिलेली आहे व त्या अनुषंगाने सामाजिक शास्त्रे संकुलामार्फत उपरोक्त पत्राद्वारे प्रस्तुत कार्यालयाकडे सदरचा विषय आगामी विद्यापरिषदेच्या बैठकीत ठेवावा असे कळविले आहे.

वास्तविक पाहता महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ व अनुषंगिक परिनियम यामध्ये एखादा अभ्यासक्रम स्थगित करण्याबाबत कोणतीही तरतुद नाही.

सबब, सामाजिक शास्त्रे संकुलातील A.I.H.C.&.A या विभागामार्फत चालविले जाणारे P.G.Diploma in Museology व P.G.Diploma in Tourism हे दोन्ही अभ्यासक्रम स्थगित करण्याबाबत मा.संचालक, सामाजिक शास्त्रे संकुल, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांनी सादर केलेले पत्र विचारार्थ).

**ठराव: सामाजिक शास्त्रे संकुलातील A.I.H.C.&.A या विभागामार्फत चालविले जाणारे P.G.Diploma in Museology व P.G.Diploma in Tourism हे दोन्ही अभ्यासक्रम तात्पुरते स्थगित करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

## मा.कुलगुरुमहोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:

**[ २२(१) ] रुक्माई इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयातील बी.सी.ए. हा अभ्यासक्रम शै. वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

**(टिपणी:** मा प्राचार्य, रुक्माई इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर यांचेकडून महाविद्यालयातील बी.सी.ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

| संस्थेचे नांव | महाविद्यालयाचे नांव | बंद करावयाचे वर्ष | बंद करावयाचा अभ्यासक्रम | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| **मागास समाज सेवा मंडळ, नेहरु नगर, सोलापूर, जि.सोलापूर.** | **रुक्माई इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर.** | **शै.वर्ष २०१४-१५ पासून** | **बी.सी.ए.** | **कायम विनाअनुदानित** |

उक्त संस्थेच्या संचलित रुक्माई इंस्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयातील बी.सी.ए. अभ्यासक्रमास महाराष्ट्र शासनाने व विद्यापीठाने शै.वर्ष २००६-०७ पासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता दिलेली होती. परंतु सदर अभ्यासक्रमास आवश्यक असणारी नियमीत प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी संख्या उपलब्ध होत नसल्याने महाविद्यालयाने शै.वर्ष २०१४-१५ पासून बी.सी.ए. अभ्यासक्रम बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याचे प्राप्त प्रस्तावात नमुद केले आहे.

महाविद्यालय/विद्याशाखा/विषय/अभ्यासक्रम व अतिरिक्त तुकडी बंद करण्याबाबत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२(३) अन्वये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

On receipt of such an application the Academic Council shall cause to make enquiries as it may deem fit, to assess and determine whether the college or recognized institution be permitted to effect the closure.

The Academic Council may, examine whether the closure should be avoided by providing necessary assistance or taking over of the college or institution by the university or transferring it to another management.

उपरोक्तप्रमाणे महाविद्यालयाकडून बी.सी.ए. अभ्यासक्रम बंद करण्याबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावासंदर्भात संबंधित महाविद्यालयाला भेट देऊन आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यास्तव महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) अन्वये खालील स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

१. डॉ.ए.ए.शेख (अध्यक्ष)

२. श्री प्रमोद दर्गोपाटील (सदस्य)

३. श्री आर.एस.मेंते (सदस्य)

सदर समितीने उपरोक्त महाविद्यालयास भेट देवुन सविस्तर अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला आहे. सदर अहवालात समितीने शै.वर्ष २०१४-१५ पासून महाविद्यालयातील बी.सी.ए. अभ्यासक्रम बंद करण्याची शिफारस केलेली आहे.

त्या अनुषंगाने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२(३)(४) मधील तरतुदीन्वये रुक्माई इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयातील बी.सी.ए.हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याची बाब दि.२४/०४/२०१४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या सभेत विचारार्थ सादर केली असता, विद्यापरिषदेने ठराव क्र.९७ अन्वये सदर महाविद्यालयातील बी.सी.ए.हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

**सबब, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ नुसार रुक्माई इंन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयातील बी.सी.ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).**

**ठराव:** **रुक्माई इंन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर या महाविद्यालयातील बी. सी. ए. हा अभ्यासक्रम शै. वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ २२(२) ] सौ.सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग. ता.बार्शी या महाविद्यालयातील बी.सी.ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: मा.प्राचार्य, सौ.सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग. ता.बार्शी यांचेकडून महाविद्यालयातील बी.सी.ए. अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला होता.

| संस्थेचे नांव | महाविद्यालयाचे नांव | बंद करावयाचे वर्ष | बंद करावयाचा अभ्यासक्रम | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| **सुवर्णशांती बहुउद्देशीय मंडळ, वैराग. ता.बार्शी, जि.सोलापूर** | **सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग. ता.बार्शी, जि.सोलापूर** | **शै.वर्ष २०१४-१५ पासून** | **बी.सी.ए.** | **कायम विनाअनुदानित** |

उक्त संस्थेच्या संचलित सौ.सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग या महाविद्यालयातील बी.सी.ए. अभ्यासक्रमास महाराष्ट्र शासनाने व विद्यापीठाने शै.वर्ष २००९-१० पासून कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता दिलेली होती. परंतु महाविद्यालयात सुरु असलेल्या बी.सी.ए. अभ्यासक्रमास आवश्यक असणारी विद्यार्थी संख्या उपलब्ध होत नसल्यामुळे महाविद्यालयाने सदर अभ्यासक्रम बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याचे प्राप्त प्रस्तावात नमुद केले आहे.

महाविद्यालय/विद्याशाखा/विषय/अभ्यासक्रम व अतिरिक्त तुकडी बंद करण्याबाबत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२(३) अन्वये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

On receipt of such an application the Academic Council shall cause to make enquiries as it may deem fit, to assess and determine whether the college or recognized institution be permitted to effect the closure.

The Academic Council may, examine whether the closure should be avoided by providing necessary assistance or taking over of the college or institution by the university or transferring it to another management.

उपरोक्तप्रमाणे महाविद्यालयाकडून बी.सी.ए. अभ्यासक्रम बंद करण्याबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावासंदर्भात संबंधित महाविद्यालयाला भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यास्तव महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२(३) अन्वये खालील समिती सदस्यांची स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

**१. डॉ. ए.ए. शेख (अध्यक्ष)**
**२. डॉ. श्रीमती एस.आर. याजमान्य (सदस्य)**
**३. श्री. आर.एस. मेंते (सदस्य)**

सदर समितीने उपरोक्त महाविद्यालयास भेट देऊन सविस्तर अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला आहे. सदर अहवालात समितीने शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून महाविद्यालयातील बी.सी.ए. अभ्यासक्रम बंद करण्याची शिफारस केलेली आहे.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) (४) मधील तरतुदीन्वये सौ.सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग. ता.बार्शी या महाविद्यालयातील बी.सी.ए. अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याची बाब दि.२४/०४/२०१४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या सभेत विचारार्थ सादर केली असता, विद्यापरिषदेने ठराव क्र.९८ अन्वये सदर महाविद्यालयातील बी.सी.ए. अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

**सबब, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ नुसार सौ.सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग. ता.बार्शी या महाविद्यालयातील बी.सी.ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).**

ठरावः **सौ.सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग, ता.बार्शी या महाविद्यालयातील बी.सी.ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ २२(३) ] कर्मयोगी अभियांत्रिकी महाविद्यालय, शेळवे. ता.पंढरपूर या महाविद्यालयात सुरु असलेल्या इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग या पदवी अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेशक्षमता शै.वर्ष २०१४-१५ पासून १२० वरुन ६० अशी ६० ने विद्यार्थी प्रवेशक्षमता घटीत करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

**(टिपणी:** मा.प्राचार्य, कर्मयोगी अभियांत्रिकी महाविद्यालय, शेळवे. ता.पंढरपूर यांनी सदर महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग या पदवी अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेशक्षमता खालील कारणास्तव शै.वर्ष २०१४-१५ पासून १२० वरुन ६० अशी ६० ने विद्यार्थी प्रवेशक्षमता घटीत करण्याबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे.

**JUSTIFICATION FOR REDUCTION IN INTAKE**

1. Admission status of last three years for E.&.T.C.

| Course requested for reduction | Sanctioned intake up to 2013-14 | No of Admission | | | Proposed intake form 2014-15 |
|---|---|---|---|---|---|
| | | 2010-11 | 2011-12 | 2012-13 | |
| Electronics & Telecommunication Engineering | 120 | 59 | 23 | 09 | 60 |

2. Rearrangement of students:
   As we are requesting for reduction in intake and not for complete closure E.&.T.C. course Will run in future with 60 intake. Hence there will be no issue of rearrangement of students.

3. Staff Liabilities:
   We are responsible for the settlement of liabilities towards staff as per existing norms and regulation on that behalf.

अतिरिक्त तुकडी व अतिरिक्त विद्यार्थी प्रवेश कमी करण्यासंदर्भात महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मध्ये कोणतीही तरतुद दिसून येत नाही. तथापि ए.आय.सी.टी.ई., नवी दिल्ली यांचे नियमावलीनुसार त्यांचे प्राधिकरणांतर्गत येणारे विषय/अभ्यासक्रम/अतिरिक्त विद्यार्थी प्रवेशक्षमता/विद्याशाखा बंद करण्यासाठी संबंधित विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणपत्र ए.आय.सी.टी.ई. कडे सादर करणे महाविद्यालयास अनिवार्य आहे.

त्यास्तव प्रस्तुत महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग या पदवी अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेशक्षमता शै.वर्ष २०१४-१५ पासून १२० वरुन ६० अशी ६० ने कमी करणेकामी महाविद्यालयास भेट देवून अहवाल प्राप्त करण्यास्तव मा.कुलगुरु महोदय यांनी खालील प्रमाणे स्थानिक चौकशी समिती सदस्यांचे नामनिर्देशन केले होते.

**१). प्राचार्य, डॉ.एस.ए. हलकुडे (अध्यक्ष), २). डॉ. एस.के. दिक्षित (सदस्य) आणि**
**३). श्री. व्ही.एस. शिरवळ (सदस्य)**

सदर समिती सदस्यांनी महाविद्यालयास भेट देवून अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला असून सदर अहवालात उक्त महाविद्यालयात सुरु असलेल्या इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग या अभ्यासक्रमास प्रवेशक्षमतेच्या प्रमाणापेक्षा कमी विद्यार्थी प्रवेशित असल्याने सदर अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेशक्षमता शै.वर्ष २०१४-१५ पासून १२० वरुन ६० अशी ६० ने कमी करण्याची शिफारस केलेली आहे.

ए.आय.सी.टी.ई. यांचे नियमावलीनुसार महाविद्यालयास इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग या पदवी अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेशक्षमता शै.वर्ष २०१४-१५ पासून १२० वरुन ६० अशी ६० ने कमी करण्यासंदर्भातील पुढील कार्यवाहीस्तव प्रस्तुत विद्यापीठाचे, ए.आय.सी.टी.ई यांचे विहीत नमुन्यात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करावे लागणार आहे. व तद्नंतर सदर अभ्यासक्रम बंद करण्यास ए.आय.सी.टी.ई व महाराष्ट्र शासन यांची मान्यता प्राप्त झ ालेनंतर सदर अभ्यासक्रम बंद करण्यास पुनःश्च विद्यापरिषदेची मान्यता घेणे क्रमप्राप्त आहे.

त्यास्तव, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) (४) मधील तरतुदीन्वये उपरोक्त संस्थेचे संचलित, कर्मयोगी अभियांत्रिकी महाविद्यालय, शेळवे या महाविद्यालयात सुरू असलेला इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग हा पदवी अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून १२० वरुन ६० अशी ६० ने कमी करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याची बाब दि.२४/०४/२०१४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या सभेत विचारार्थ सादर केली असता, विद्यापरिषदेने ठराव क्र. २९७ अन्वये सदर महाविद्यालयात सुरू असलेला इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग हा पदवी अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून १२० वरुन ६० अशी ६० ने कमी करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

या कार्यालयाकडे उपलब्ध असलेले रेकॉर्ड पाहता, सद्यःस्थितीत (शै.वर्ष २०१३-१४ मध्ये) सदर महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांची स्थिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | विद्यार्थी प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलिकम्युनिकेशन इंजि. भाग १ | १२० (६०+६०) | २८ |
| २ | इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलिकम्युनिकेशन इंजि. भाग २ | १२० (६०+६०) | २३ |
| ३ | इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलिकम्युनिकेशन इंजि. भाग ३ | १२० (६०+६०) | ३७ |
| ४ | इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलिकम्युनिकेशन इंजि. भाग ४ | १२० (६०+६०) | ५० |

**सबब, कर्मयोगी अभियांत्रिकी महाविद्यालय, शेळवे. ता.पंढरपूर या महाविद्यालयात सुरु असलेल्या इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग या पदवी अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेशक्षमता शै.वर्ष २०१४-१५ पासून १२० वरुन ६० अशी ६० ने विद्यार्थी प्रवेशक्षमता घटीत करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याची बाब विचारार्थ).**

**ठरावः** **कर्मयोगी अभियांत्रिकी महाविद्यालय, शेळवे, ता.पंढरपूर या महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग या पदवी अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेशक्षमता शै.वर्ष २०१४-१५ पासून १२० वरुन ६० करण्यास ना-हरकत प्रमाणपत्र देण्याची विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[२२(४)] माऊली महाविद्यालय, वडाळा या महाविद्यालयातील बी.सी.ए. हा अभ्यासक्रम शै. वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

**(टिपणी :** मा प्राचार्य, माऊली महाविद्यालय, वडाळा यांचेकडून महाविद्यालयातील बी.सी.ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

| संस्थेचे नांव | महाविद्यालयाचे नांव | बंद करावयाचे वर्ष | बंद करावयाचा अभ्यासक्रम | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| **श्री भारत शिक्षण प्रसारक मंडळ, वडाळा, जि.सोलापूर.** | **माऊली महाविद्यालय, वडाळा.** | **शै.वर्ष २०१४-१५ पासून** | **बी.सी.ए.** | **कायम विनाअनुदानित** |

उक्त संस्थेच्या संचलित माऊ ली महाविद्यालय, वडाळा या महाविद्यालयातील बी.सी.ए. अभ्यासक्रमास महाराष्ट्र शासनाची शै.वर्ष २००७-०८ पासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता मिळालेली होती. त्याअनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाने संलग्निकरणाची सर्व कार्यवाही पूर्ण करुन बी.सी.ए. या नवीन अभ्यासक्रमास शै.वर्ष २००८-०९ पासून प्रथम संलग्निकरण दिलेले होते.

परंतु सदर अभ्यासक्रमास आवश्यक असणारी विद्यार्थी संख्या उपलब्ध होत नसल्याने महाविद्यालयाने शै.वर्ष २०१४-१५ पासून बी.सी.ए. अभ्यासक्रम बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याचे प्राप्त प्रस्तावात नमुद केले आहे.

महाविद्यालय/विद्याशाखा/विषय/अभ्यासक्रम व अतिरिक्त तुकडी बंद करण्याबाबत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२(३) अन्वये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

On receipt of such an application the Academic Council shall cause to make enquiries as it may deem fit, to assess and determine whether the college or recognized institution be permitted to effect the closure.

The Academic Council may, examine whether the closure should be avoided by providing necessary assistance or taking over of the college or institution by the university or transferring it to another management.

उपरोक्तप्रमाणे महाविद्यालयाकडून बी.सी.ए. अभ्यासक्रम बंद करण्याबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावासंदर्भात संबंधित महाविद्यालयाला भेट देऊन आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यास्तव महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) अन्वये खालील स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

१. डॉ.ए.ए.शेख (अध्यक्ष)
२. श्री प्रमोद दर्गोपाटील (सदस्य)
३. श्री आर.एस.मेंते (सदस्य)

सदर समितीने उपरोक्त महाविद्यालयास भेट देवुन सविस्तर अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला आहे. सदर अहवालात समितीने शै.वर्ष २०१४-१५ पासून महाविद्यालयातील बी.सी.ए. अभ्यासक्रम बंद करण्याची शिफारस केलेली आहे.

त्या अनुषंगाने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२(३)(४) मधील तरतुदीन्वये माऊ ली महाविद्यालय, वडाळा या महाविद्यालयातील बी.सी.ए.हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याची बाब दि.२४/०४/२०१४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या सभेत विचारार्थ सादर केली असता, विद्यापरिषदेने ठराव क्र.२९९ अन्वये सदर महाविद्यालयातील बी.सी.ए.हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

**सबब, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ नुसार माऊ ली महाविद्यालय, वडाळा या महाविद्यालयातील बी.सी.ए. हा अभ्यासक्रम शै. वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).**

ठरावः **माऊली महाविद्यालय, वडाळा या महाविद्यालयातील बी.सी.ए. हा अभ्यासक्रम शै. वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ २२(५) ] स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर या महाविद्यालयात सुरु असलेला एम.फार्मसी. (क्वालिटी अॅश्युरन्स) हा पदव्युत्तर अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत विद्यापरिषदेनी केलेली शिफारस विचारार्थ.**

**टिपणी:** मा.सचिव, श्री. विठ्ठल एज्युकेशन अॅन्ड रिसर्च इन्स्टिटयुट, पंढरपूर यांनी संचलित स्वेरीज कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर या महाविद्यालयात सुरु असलेला एम.फार्मसी.(क्वालिटी अॅश्युरन्स) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे.

सदर महाविद्यालयात शै.वर्ष २०११-१२ पासून एम.फार्मसी.(क्वालिटी अॅश्युरन्स) हा अभ्यासक्रम सुरु आहे.

१. महाविद्यालयातील एम.फार्मसी.(क्वालिटी अॅश्युरन्स) (प्रवेशक्षमता-१८)या अभ्यासक्रमास शै.वर्ष २०११-१२ मध्ये १० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता.
२. शै.वर्ष २०१२-१३ मध्ये एका विद्यार्थ्याने सदर अभ्यासक्रमास प्रवेश घेतला होता.
३. तसेच शै.वर्ष २०१३-१४ मध्ये एकाही विद्यार्थ्याने प्रवेश घेतला नाही.
४. विद्यार्थ्यांचा प्रतिसाद नसला तरीही मूलभूत सुविधा व शिक्षक प्रवेशक्षमतेनुसारच ठेवावे लागतात.

तथापि उक्त कारणास्तव सदर संस्थेने महाविद्यालयातील एम.फार्मसी.(क्वालिटी अॅश्युरन्स) हा अभ्यासक्रम बंद करीत असल्याचे प्रस्तावात नमुद करुन संस्थेने सदर अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत रितसर शुल्कासह प्रस्ताव सादर केलेला आहे.

महाविद्यालय/विद्याशाखा/विषय/अभ्यासक्रम व अतिरीक्त तुकडी बंद करण्याबाबत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) अन्वये खालील प्रमाणे तरतूद आहे.

On receipt of such an application the Academic Council shall cause to make enquiries as it may deem fit, to assess and determine whether the college or recognized institution be permitted to effect the closure.

The Academic Council may, examine whether the closure should be avoided by providing necessary assistance or taking over of the college or institution by the university or transferring it to another management.

अभ्यासक्रम बंद करण्याबाबत विद्यापरिषदेस उपरोक्तप्रमाणे अधिकार दिलेले आहेत. उपरोक्त तरतूद अवलोकनी घेवून प्रस्तुत महाविद्यालयात सुरु असलेला एम.फार्मसी.(क्वालिटी अॅश्युरन्स) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भातील कार्यवाही करण्यास्तव महाविद्यालयास भेट देवून अहवाल प्राप्त करण्यास्तव विद्यापरिषदेकडून स्थानिक चौकशी समिती नियुक्त करणे आवश्यक होते. तथापि दरम्यानच्याकाळात विद्यापरिषदेची सभा आयोजित होणार नसल्याने विद्यापरिषदेच्यावतीने मा.कुलगुरु महोदय यांनी सदर महाविद्यालयास प्रत्यक्षात भेट देवून अहवाल सादर करण्यास्तव म.वि.कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये खालील प्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती. सदरची बाब दि.०७/११/२०१३ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीत माहितीस्तव सादर करण्यात आली होती.

**१). प्राचार्य, डॉ.एस.ए. हलकुडे (अध्यक्ष), २). प्राचार्य, आर.वाय. पाटील (सदस्य) आणि**

**३). डॉ. एम.एस. कलशेट्टी (सदस्य)**

सदर समिती सदस्यांनी महाविद्यालयास भेट देवून अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला असून सदर अहवालात उक्त महाविद्यालयात सुरु असलेला एम.फार्मसी. (क्वालिटी अश्युरन्स) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याची शिफारस केलेली आहे. ए.आय.सी.टी.ई यांचे नियमावलीनुसार महाविद्यालयास एम.फार्मसी. (क्वालिटी अश्युरन्स) हा अभ्यासक्रम बंद करण्यासंदर्भातील पुढील कार्यवाहीस्तव प्रस्तुत विद्यापीठाचे, ए.आय.सी.टी.ई यांचे विहीत नमुन्यात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करावे लागणार आहे. व तद्‌नंतर सदर अभ्यासक्रम बंद करण्यास ए.आय.सी.टी.ई व महाराष्ट्र शासन यांची मान्यता प्राप्त झालेनंतर सदर अभ्यासक्रम बंद करण्यास पुनःश्च विद्यापरिषदेची मान्यता घेणे क्रमप्राप्त आहे.

त्यास्तव, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) (४) मधील तरतुदीन्वये उपरोक्त संस्थेचे संचलित, स्वेरीज कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर या महाविद्यालयात सुरू असलेला एम.फार्मसी (क्वालिटी अश्युरन्स) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याची बाब दि.२४/०४/२०१४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या सभेत विचारार्थ सादर केली असता, विद्यापरिषदेने ठराव क्र. ३०० अन्वये सदर महाविद्यालयात सुरू असलेला एम.फार्मसी (क्वालिटी अश्युरन्स) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

समितीने सादर केलेला अहवाल पाहता, सद्यःस्थितीत (शै.वर्ष २०१३-१४ मध्ये) सदर महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांची स्थिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | विद्यार्थी प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | एम.फार्मसी. (क्वालिटी अश्युरन्स) भाग १ | १८ | ०० |
| २ | एम.फार्मसी. (क्वालिटी अश्युरन्स) भाग २ | १८ | ०१ |

**सबब, स्वेरीज कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर या महाविद्यालयात सुरु असलेला एम.फार्मसी.(क्वालिटी ॲश्युरन्स) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).**

**ठरावः स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर या महाविद्यालयातील एम.फार्मसी. (क्वालिटी ॲश्युरन्स) हा पदव्युत्तर अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यास ना-हरकत प्रमाणपत्र देण्याची विद्यापरिषदेनी केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ २२(६) ] स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर या महाविद्यालयात सुरु असलेला एम.फार्मसी.(फार्मासुटिकल केमिस्ट्री) हा पदव्युत्तर अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत विद्यापरिषदेनी केलेली शिफारस विचारार्थ.**

**टिपणी:** मा.सचिव, श्री. विठ्ठल एज्युकेशन ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयुट, पंढरपूर यांनी संचलित स्वेरीज कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर या महाविद्यालयात सुरु असलेला एम.फार्मसी.(फार्मासुटिकल केमिस्ट्री) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे.

सदर महाविद्यालयात शै.वर्ष २०११-१२ पासून एम.फार्मसी.(फार्मासुटिकल केमिस्ट्री) हा अभ्यासक्रम सुरु आहे.

१. महाविद्यालयातील एम.फार्मसी.(फार्मासुटिकल केमिस्ट्री) (प्रवेशक्षमता-१८)या अभ्यासक्रमास शै.वर्ष २०११-१२ मध्ये ०८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता.
२. शै.वर्ष २०१२-१३ मध्ये एकही विद्यार्थ्यांनी सदर अभ्यासक्रमास प्रवेश घेतला नाही.
३. तसेच शै.वर्ष २०१३-१४ मध्ये केवळ ०३ विद्यार्थ्यांनी सदर अभ्यासक्रमास प्रवेश घेतला आहे.
४. विद्यार्थ्यांचा प्रतिसाद नसला तरीही मूलभूत सुविधा व शिक्षक प्रवेशक्षमतेनुसारच ठेवावे लागतात.

तथापि उक्त कारणास्तव सदर संस्थेने महाविद्यालयातील एम.फार्मसी.(फार्मासुटिकल केमिस्ट्री) हा अभ्यासक्रम बंद करीत असल्याचे प्रस्तावात नमुद करुन संस्थेने सदर अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याबाबत रितसर शुल्कासह प्रस्ताव सादर केलेला आहे.

महाविद्यालय/विद्याशाखा/विषय/अभ्यासक्रम व अतिरीक्त तुकडी बंद करण्याबाबत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) अन्वये खालील प्रमाणे तरतूद आहे.

On receipt of such an application the Academic Council shall cause to make enquiries as it may deem fit, to assess and determine whether the college or recognized institution be permitted to effect the closure.

The Academic Council may, examine whether the closure should be avoided by providing necessary assistance or taking over of the college or institution by the university or transferring it to another management.

अभ्यासक्रम बंद करण्याबाबत विद्यापरिषदेस उपरोक्तप्रमाणे अधिकार दिलेले आहेत. उपरोक्त तरतूद अवलोकनी घेवून प्रस्तुत महाविद्यालयात सुरु असलेला एम.फार्मसी.(फार्मासुटिकल केमिस्ट्री) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भातील कार्यवाही करण्यास्तव महाविद्यालयास भेट देवून अहवाल प्राप्त करण्यास्तव विद्यापरिषदेकडून स्थानिक चौकशी समिती नियुक्त करणे आवश्यक होते. तथापि दरम्यानच्याकाळात विद्यापरिषदेची सभा आयोजित होणार नसल्याने विद्यापरिषदेच्यावतीने मा.कुलगुरु महोदय यांनी सदर महाविद्यालयास प्रत्यक्षात भेट देवून अहवाल सादर करण्यास्तव म.वि.कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये खालील प्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त क रण्यात आली होती. सदरची बाब दि.०७/११/२०१३ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीत माहितीस्तव सादर करण्यात आली होती.

**१). प्राचार्य, डॉ.एस.ए. हलकुडे (अध्यक्ष), २). प्राचार्य, डॉ. आर.वाय. पाटील (सदस्य) आणि ३). डॉ. एम.एस. कलशेट्टी (सदस्य)**

सदर समिती सदस्यांनी महाविद्यालयास भेट देवून अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला असून सदर अहवालात उक्त महाविद्यालयात सुरु असलेला एम.फार्मसी.(फार्मासुटिकल केमिस्ट्री) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्याची शिफारस केलेली आहे. ए.आय.सी.टी.ई यांचे नियमावलीनुसार महाविद्यालयास एम.फार्मसी.(फार्मासुटिकल केमिस्ट्री) हा अभ्यासक्रम बंद करण्यासंदर्भातील पुढील कार्यवाहीस्तव प्रस्तुत विद्यापीठाचे, ए.आय.सी.टी.ई यांचे विहीत नमुन्यात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करावे लागणार आहे. व तद्नंतर सदर अभ्यासक्रम बंद करण्यास ए.आय.सी.टी.ई व महाराष्ट्र शासन यांची मान्यता प्राप्त झालेनंतर सदर अभ्यासक्रम बंद करण्यास पुनःश्च विद्यापरिषदेची मान्यता घेणे क्रमप्राप्त आहे.

त्यास्तव, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) (४) मधील तरतुदीन्वये उपरोक्त संस्थेचे संचलित, स्वेरीज कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर या महाविद्यालयात सुरू असलेला एम.फार्मसी (फार्मासुटिकल केमिस्ट्री) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याची बाब दि.२४/०४/२०१४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या सभेत विचारार्थ सादर केली असता, विद्यापरिषदेने ठराव क्र. ३०१ अन्वये सदर महाविद्यालयात सुरू असलेला एम.फार्मसी (फार्मासुटिकल केमिस्ट्री) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

समितीने सादर केलेला अहवाल पाहता, सद्यःस्थितीत (शै.वर्ष २०१३-१४ मध्ये) सदर महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांची स्थिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | विद्यार्थी प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | एम.फार्मसी.(फार्मासुटिकल केमिस्ट्री) भाग १ | १८ | ०३ |
| २ | एम.फार्मसी.(फार्मासुटिकल केमिस्ट्री) भाग २ | १८ | ०० |

**सबब, स्वेरीज कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर या महाविद्यालयात सुरु असलेला एम.फार्मसी. (फार्मासुटिकल केमिस्ट्री) हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून टप्प्याटप्याने बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).**

**ठरावः स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूर या महाविद्यालयातील एम. फार्मसी. (फार्मासुटिकल केमिस्ट्री) हा पदव्युत्तर अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यास ना-हरकत प्रमाणपत्र देण्याची विद्यापरिषदेनी केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ २२(७) ] दि. १९ सप्टेंबर १९९१ ते २३ ऑक्टोंबर १९९२ दरम्यान नियुक्त झालेल्या बिगर नेट/सेट अर्हताधारक शिक्षकांना यापूर्वी तदर्थ (Ad-hoc) अशी मान्यता दिलेल्या शिक्षकांना शासन निर्णय व शिक्षण संचालनालय यांचे परिपत्रकातील अनुपालन करावयाचे बाबी क्र. १ ते १० नुसार सेवानियमित करुन सोबत जोडलेल्या तक्तातील रकाना क्र. १३ प्रमाणे लाभ देण्यासाठी विद्यापीठाची नियमीत मान्यता** (Regular Approval) **देणेबाबतचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी :- मा. शिक्षण संचालक उच्च शिक्षण पुणे यांचेकडून प्राप्त झालेले ११ सप्टेंबर २०१३ रोजीचे पत्र व दि. २४/०३/२०१४ रोजीचे परिपत्रक सोबत जोडले असून कृपया अवलोकनी घ्यावे.

सदरच्या पत्रामध्ये राज्यातील अकृषी विद्यापीठातील संलग्नीत अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा नियमित करुन त्यांना अनुषंगिक देणेबाबत दि. २७ जुन २०१३ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी, असे कळविले आहे.

दि. १९ सप्टेंबर १९९१ ते २३ ऑक्टोंबर १९९२ दरम्यान नियुक्त झालेल्या बिगर नेट/सेट अर्हताधारक शिक्षकांना यापूर्वी तदर्थ (Ad-hoc) अशी मान्यता दिलेली आहे. सदर शिक्षकांना शासन निर्णय व शिक्षण संचालनालय यांचे परिपत्रकातील अनुपालन करावयाचे बाबी क्र. १ ते १० नुसार सेवानियमित करुन सोबत जोडलेल्या तक्तातील रकाना क्र. १३ मधील शिफारशीप्रमाणे विद्यापीठाची नियमीत मान्यता (Regular Approval) देणे आवश्यक आहे.

सबब सोबत जोडलेल्या तक्ता अ, ब, व क मधील शिक्षकांना समितीच्या शिफारशीप्रमाणे विद्यापीठाची नियमित मान्यता (Regular Approval) देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेसमोर विचारार्थ सादर).

**ठरावः दि.१९ सप्टेंबर, १९९१ ते २३ ऑक्टोबर, १९९२ दरम्यान नियुक्त झालेल्या बिगर नेट/सेट अर्हताधारक शिक्षकांना यापूर्वी तदर्थ (Ad-hoc) अशी मान्यता दिलेल्या शिक्षकांना शासन निर्णय व शिक्षण संचालनालय यांचे परिपत्रकातील अनुपालन करावयाचे बाबी क्र. १ ते १० नुसार सेवानियमित करुन तक्तातील रकाना क्र. १३ प्रमाणे लाभ देण्यासाठी विद्यापीठाची नियमीत मान्यता** (Regular Approval) **देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ २२(८) ] विना अनुदानीत महाविद्यालयातील शिक्षकांसाठी सेवानिवृत्ती नंतर वयोमर्यादा ६५ वरुन ७० पर्यंत वाढविणेबाबत.**

(टिपणी: प्राचार्य, श्री. पवार एस.के., सदस्य, व्यवस्थापन परिषद, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांनी दिनांक २०-०३-२०१४ रोजीच्या पत्रानुसार दिलेले निवेदन सोबत जोडले असून कृपया अवलोकन व्हावे.

उपरोक्त पत्रासोबत प्राचार्य श्री. एस के. पवार यांनी महाराष्ट्र शासन, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) यांचे पत्र क्र. यूएनआय/२००७/३०८६८/मुवि/विशि-१/३०८७, दिनांक २३-०४-२००७ रोजीचे पत्र जोडले आहे. सदर पत्रमध्ये विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांची वयोमर्यादाबाबतच्या पत्रानुसार विद्यापीठाच्या संलग्नित अनुदानित महाविद्यालये व संस्थामधिल शिक्षक कर्मचाऱ्यांचे नियत सेवानिवृत्तीचे वय ६२ वरून ६५ करण्यात आलेले आहे. तसेच पूर्णपणे शैक्षणिक अर्हता धारक अनुभवी शिक्षकांची कमतरता विचारात घेवून दिनांक १५-०३-२००७ पूर्वी सेवानिवृत्त शिक्षक कर्मचाऱ्यांना **(विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शन तत्त्वानुसार) वयाच्या ७० वर्षापर्यंत पुनरनियुक्ती देण्यात येते.** सदर प्रकरणी माहिती राज्य शासनास आणि केंद्र शासनाकडे सादर करावायाची आहे. असे नमुद केले आहे.

उपरोक्त पत्रात नमुद केलेल्या बाबी व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवून चर्चा घडवून आणण्याबाबत मा. प्राचार्य पवार एस. के. यांनी विनंती केली आहे).

**ठराव: महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयानुसार कार्यवाहीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच दि.१५/०३/२००७ पूर्वी सेवानिवृत्त शिक्षक कर्मचाऱ्यांना (विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शन तत्त्वानुसार) वयाच्या ७० वर्षापर्यंत पुनरनियुक्ती देताना संबंधित संस्थाचालकांकडून योग्य ते हमीपत्र भरुन घ्यावे असे सर्वानुमते ठरले.**

**[ २२(९) ] विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयास आकारण्यात येणारी युवा महोत्सव फी रु.२०/- ऐवजी रु.४०/- करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणीः विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागातर्फे युवा महोत्सवाच्या आयोजनासाठी यजमान महाविद्यालयांना विद्यापीठाच्या स्थापनेपासून रु.१,००,०००/-अनुदान दिले जात होते. सन २००४ ते २०१३ या दरम्यान महाविद्यालयाचा वाढता सहभाग विचारात घेता सहभागी विद्यार्थी कलाकाराची वाढ होत आहे. वाढती महागाई लक्षात घेता युवा महोत्सवाचे आयोजन करीत असताना यजमान महाविद्यालयास ज्यास्तीत ज्यास्त खर्चाचा भार सोसावा लागत आहे. त्यामुळे भविष्यात युवा महोत्सवासाठी यजमान पद स्वीकारण्याच्या प्रति शहरी व ग्रामीण महाविद्यालयातून उदासिनता दिसून येत आहे.

विद्यार्थी कल्याण विभागाची फी स्वरूपातील उत्पन्नाची बाजू विचारात महाविद्यालयानी प्रवेशाच्या वेळी प्रति विद्यार्थी रु.२०/- प्रमाणे आकरलेल्या फी पैकी महाविद्यालयाचा वाटा रु.८/- ठेवण्यात येतो व उर्वरीत रु.१२/- प्रति विद्यार्थी विद्यापीठाकडे जमा करण्यात येत असतो. सन २००४ पासून अजतागायत फक्त ७ ते ८ लाख रूपये युवा महोत्सव फी स्वरूपात जमा झालेले दिसतात. जमा झालेल्या रकमेतून विभागाकडील युवा महोत्सवातील इतर खर्च तसेच इंद्रधनुष्य युवा महोत्सवातील, पश्चिमविभागीय युवा महोत्सवातील तसेच राष्ट्रीय पातळीवरील संपूर्ण खर्च भागविण्यात येतो.

महाविद्यालयाचा वाटा प्रति विद्यार्थी रु.८/- चा विचार होता लहान महाविद्यालयात अतिशय कमी रक्कम जमा होत असल्यामुळे व युवा महोत्सवाच्या कलाप्रकाराचा व एकुण संघाच्या खर्चाचा विचार करता युवा महोत्सवात विद्यार्थ्यांचा सहभाग करण्यासाठी महाविद्यालये रस दाखवत नाहीत.

वरील बाबीचा विचार करून शैक्षणीक वर्ष (२०१३-१४) मध्ये यजमान महाविद्यालयास रु.२, ५०, ०००/- अनुदान देण्यासाठी दि.३१/०/२०१३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परीषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली होती. शैक्षणीक वर्षे २०१४-१५ व त्यापूढेही यजमान महाविद्यालयास अनुदान वाढवून देणे अवश्यक आहे. उपरोक्त रक्कमेची वाढ केल्यानंतर युवा महोत्सवातील इतर खर्च तसेच इंद्रधनुष्य युवा महोत्सवातील, पश्चिमविभागीय युवा महोत्सवातील तसेच राष्ट्रीय पातळीवरील संपूर्ण खर्चाचा विचार करता केलेली अंदाजपत्रकीय तरतूद अत्यंत कमी पडत आहे. त्यासाठी सलग्न महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याकडून आकरण्यात येणा-या फी मध्ये प्रति विद्यार्थी रु.२०/- ऐवजी रु.४०/- इतकी वाढ करून त्यातील रक्कम रु.१६/- महाविद्यालयाच्या खर्चासाठी ठेवून उर्वरीत रु.२४/- विद्यापीठाकडे जमा करण्याबाबतचा विषय दि. २४/०४/२०१४ रोजीच्या विद्यापरीषदेत ठेवण्यात आलेला होता. विद्यापरिषदेच्या बैठकीत ठराव क्र १११ अन्वये सदरचा विषय हा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ ठेवण्यास सुचविलेले आहे. त्यानुसार सलग्न महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याकडून आकरण्यात येणा-या फी मध्ये प्रति विद्यार्थी रु.२०/- ऐवजी रु.४०/- इतकी वाढ करून त्यातील रक्कम रु.१६/- महाविद्यालयाच्या खर्चासाठी ठेवून उर्वरीत रु.२४/- विद्यापीठाकडे जमा करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठरावः विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आकारण्यात येणारे युवा महोत्सव शुल्क रु.२०/- ऐवजी रु.४०/- करण्यासाठी विद्यापरिषदेची शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[२२(१०)] संचालक, विद्यार्थी कल्याण, क्रीडा संचालक, कार्यक्रम समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना यांना विद्यापीठात येणा-जाण्यासाठी आणि त्याच्या दूरध्वनीचा खर्च म्हणून काही रक्कम देण्याबाबतची बाब विचारार्थ**

(टिपणीः डॉ. बी. एन. कांबळे, समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना यांनी दि.२८/०२/२०१४ रोजीच्या पत्रानुसार कार्यक्रम समन्वयकाचे मानधन रु. ४०००/- च्या ऐवजी रु.२०,०००/- इतकी वाढ करण्याबाबत विंनती केली होती. त्यानुषंगाने व्यवस्थापन परिषदेच्या दि.०३ मार्च, २०१४ रोजीच्या बैठकीत खालीलप्रमाणे ठराव पारीत झाला आहे.

"विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना समन्वयकपदी नियुक्ती ही एक सन्मानजनक बाब असल्याने त्याचा वाढत्या महागाईशी किंवा इतर बाबींशी संबंध जोडता येत नाही, त्यामुळे मानधनवाढीबाबतची मागणी सर्वानुमते अमान्य करण्यात आली".

तसेच प्रा. प्रशांत नलावडे, संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग यांनी दि.२८/०२/२०१४ रोजीच्या पत्रानुसार संचालक पदासाठी मिळाणारे मानधन रु. ४०००/- च्या ऐवजी रु.१०,०००/- इतकी वाढ करण्याबाबत विंनती केली होती.

परंतु, उक्त व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार संचालक, विद्यार्थी कल्याण, क्रीडा संचालक, कार्यक्रम समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना यांनाही मानधनात वाढ देता येणार नाही.

**वरील परिस्थितीत संचालक, विद्यार्थी कल्याण, क्रीडा संचालक, कार्यक्रम समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना यांना विद्यापीठात येणा-जाण्यासाठी आणि त्याच्या दूरध्वनीचा खर्च म्हणून काही रक्कम देण्याबाबतची बाब विचारार्थ).**

**ठरावः संचालक विद्यार्थी कल्याण, क्रीडा संचालक, कार्यक्रम समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना यांच्या मानधनात दि.०१/०५/२०१४ पासून रु.४,०००/- वरुन रु.६,०००/- अशी वाढ देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[२२(११)] प्राईमा ग्रुप, सेक्युरटी, लेबर, पर्सनल सर्व्हिसेस, सोलापूर यांनी कंत्राटी पध्दतीने सुरक्षा सेवा व मनुष्यबळ पुरवठा करण्यासंदर्भातचे दि.१९/०२/२०१४ रोजीचे पत्र अवलोकनार्थ व निर्णयार्थ सादर.**

(टिपणी : दि.२७/१२/२००७ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विषय क्र.११, खालीलप्रमाणे ठराव झालेला होता.

*" पात्र ठेकेदारांकडून मनुष्यबळ पुरविण्यासंदर्भात मा.कुलगुरु यांनी निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आले. तसेच मे.प्राईमा ग्रुप, सोलापूर यांना येथून पुढे कोणत्याही प्रकारचे कंत्राट देवू नये असे ठरले."*

उक्त ठरावाच्या अनुषंगाने प्राईमा ग्रुपने दि.१९/०२/२०१४ च्या पत्रामध्यें सदरच्या विषयामध्ये कोठेही उल्लेख व कोठेही लिहिलेले दिसत नाही की, प्राईमा ग्रुप सोलापूर यांना येथून पुढे कोणत्याही प्रकारचे कंत्राट देवू नये. सदरचा ठराव हा प्राईमा ग्रुपला काम न देण्याच्या उद्देशाने, बेयकादेशीर व दृष्ट हेतूने झालेला आहे. तसेच एखाद्या संस्थेच्या विरोधात ठराव करावयाचा असल्यास (काळया यादीत घ्यावयाचे असल्यास) या ठरावा आधी त्या संस्थेस कळविणे बंधनकारक व कायदेशीर असताना मात्र प्राईमा ग्रुपला सदर ठरावासंदर्भात आजतागत कळविलेले नाही. तसेच प्राईमा ग्रुप या संस्थेला पुन्हा संधी दिल्यास चांगली, पारदर्शक व तत्काळ सेवा देवू अशी हमी देतो, असे कळविलेले आहे.

**सबब, प्राईमा ग्रुप, सेक्युरटी, लेबर, पर्सनल सर्व्हिसेस, सोलापूर यांनी कंत्राटी पध्दतीने सुरक्षा सेवा व मनुष्यबळ पुरवठा करण्यासंदर्भातचे दि.१९/०२/२०१४ रोजीचे पत्र अवलोकनार्थ व निर्णयार्थ सादर).**

**ठरावः हा विषय सर्व कागदपत्रांसह पुनश्चः सादर करावा असे सर्वानुमते ठरले.**

**[२२(१२)] परीक्षा विभाग, कार्यालय आणि विद्यार्थी यांच्या करीता झेरॉक्सींगच्या कामाचे वार्षिक दरकरार करण्याबाबत. मे. ज्योती एंटरप्राईजेस, सोलापूर यांच्याबरोबर झेरॉक्सींगच्या कामाचे वार्षिक दरकरार करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: परीक्षा विभागाकडील दिनांक २४/३/२०१४ रोजीच्या मान्येतस अनुसरुन वरील विषयांकीत परीक्षा विभाग, कार्यालय आणि विद्यार्थी यांच्या झेरॉक्सींगच्या कामाचे मिटर रीडींग प्रमाणे वीजबील आकारणी व जागेचे नाममात्र भाडे दरमहा रु.५००/- अशा प्रकारे आकारणीसह वार्षिक दरकरार करण्यासाठी दै.सकाळ दिनांक २६/३/२०१४ व दै.लोकमत या वृत्तपत्रामध्ये दिनांक २७/३/२०१४ रोजी जाहीर निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदा प्राप्त होण्याची अंतिम दिनांक २१/४/२०१४ ही होती. अंतिम दिनांकापर्यंत खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

| | |
|---|---|
| 1 | Prachi Sales & Services, Solapur |
| 2 | Jyoti Enterprises, Solapur |
| 3 | Unique Sales & Services, Solapur |
| 4 | Shri Ramsamrath Services, Solapur |
| 5 | Abhinay Services, Solapur |
| 6 | Balaji Automation, Solapur |
| 7 | Laxman R. Mashale Zerox, Solapur |

सदरच्या निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २८/४/२०१४ रोजी खरेदी समिती सदस्यांसमोर उघडून तुलनात्मक तक्ता तयार केला असता तुलनात्मक तक्त्यानुसार न्युनतम दर असलेल्या मे.ज्योती एंटरप्राईजेस, सोलापूर यांना कामाचे आदेश देण्याची शिफारस करण्यात आली आहे. सदर, फर्मने खालील प्रमाणे दर दिले आहे.

| Sr.No. | Particular | Rate Quoted |
|---|---|---|
| 1 | A-4 Size Paper (Singal Side) | 0.40 |
| 2 | A-4 Size Paper (Both Side) | 0.57 |
| 3 | A-3 Size Paper (Singal Side) | 0.60 |
| 4 | A-3 Size Paper (Both Side) | 0.99 |

मे.ज्योती एंटरप्राईजेस, सोलापूर यांनी वरीलप्रमाणे दर दिले असून सदर कामासाठी वार्षिक अंदाजे रु.५,००,०००/- इतका खर्च येणार आहे. उपरोक्त काम सेवा पुरविणे या प्रकारात मोडत असल्याने सदरची बाब व्यवस्थापन परिषद विषय व ठराव क्रं.२१ दिनांक २० जुलै २०११ नुसार व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवणे आवश्यक आहे.

सबब, मे.ज्योती एंटरप्राईजेस, सोलापूर यांच्याबरोबर वार्षिक दरकरार करुन झेरॉक्सींगच्या कामाचे आदेश देण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: परीक्षा विभाग, कार्यालय आणि विद्यार्थी यांच्या करीता मे. ज्योती एंटरप्राईजेस, सोलापूर यांच्याबरोबर झेरॉक्सींगच्या कामाचे खालील दरानुसार वार्षिक दरकरार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| Sr.No. | Particular | Rate Quoted |
|---|---|---|
| 1 | A-4 Size Paper (Singal Side) | 0.40 |
| 2 | A-4 Size Paper (Both Side) | 0.57 |
| 3 | A-3 Size Paper (Singal Side) | 0.60 |
| 4 | A-3 Size Paper (Both Side) | 0.99 |

**[२२(१३)] प्रस्तुत विद्यापीठाचे पदवी व पदव्युत्तर बहि:स्थ अभ्यासक्रम विद्यार्थ्याचे प्रवेश प्रकिया ऑनलाईन पध्दतीने करण्यास, खर्चास आणि महाराष्ट्र ज्ञान महामंडळ [एम. के. सी. एल.] यांच्या दरम्यान करार करणेबाबत.**

(टिपणी : विद्यापीठाकडील बहि:स्थ पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्याचे प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने करण्यास प्रशासकीय मान्यता घेवून इतर विद्यापीठाने ऑनलाईन प्रवेश प्रक्रियाबाबतची म्हणजेच शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ, मुंबई यांच्याकडून त्यांनी एम. के. सी. एल. यांच्या समवेत केलेल्या कराराची प्रत, टिपणी व आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करुन देणेबाबत विद्यापीठ कार्यालयीन पत्र क्र.सोविसो/बहिस्थ/२०१३-१४/१६५६ दि.१९/१२/२०१३ अन्वये कळविणेत आले होते. त्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी दूर शिक्षणासाठी एम.के.सी.एल. यांच्यासमवेत केलेल्या कराराची प्रत विद्यापीठ कार्यालयास उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच उच्च व तंत्र विभागाकडील क्रमांक ईसेवा २००६/[१९१/०६]/मशि-१, दि.१९/६/२००६ नुसार विविध संस्थामार्फत शिक्षण घेणा-या सर्व विद्यार्थ्यांना **ई- सुविधा** उपलब्ध करुन देण्याबाबत अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहे. [सोबत सहपत्र जोडली आहे.]

सद्यस्थितीत विद्यापीठाने मार्च/एप्रिल २०१४ या हंगामात सुरु झालेल्या सत्रनिहाय परीक्षाचे आवेदन पत्र विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात आलेले होते. त्यानंतर परीक्षा प्रवेश पत्र संबधीत विद्यार्थ्यांच्या **लॉग इन आयडी** वर उपलब्ध करुन दिलेले आहे. विद्यार्थ्यांना अत्यंत कमी वेळेत ऑनलाईन पध्दतीने प्रवेशाची आवेदन व परीक्षा प्रवेश पत्र मिळण्याची सुविधा केल्याने बहि:स्थ प्रवेश प्रक्रिया सुलभ झालेली आहे.

बहि:स्थ विद्यार्थ्यांना उक्त सुविधा उपलब्ध करुन दिल्यानंतर आजतागायात विद्यार्थ्यांची कोणत्याही प्रकारची तक्रार विद्यापीठ कार्यालयाकडे प्राप्त झालेले नाही. विद्यार्थ्यांना आवश्यक व विहित वेळेत माहिती एकाच ठिकाणी व एकाच वेळी उपलब्ध नसल्याने ती प्राप्त करुन घ्यावयास विद्यार्थ्यांना श्रम, वेळ व पैसा खर्च करावा लागत असून विद्यार्थ्यांना येणा-या या विविध अडचणी विचारात घेता आवश्यक असलेल्या व अन्य विविध सुविधा तसेच एकविसाव्या शतकातील आधुनिक शिक्षण प्रणालीचा लाभ विद्यार्थ्यांना देण्याची अभिनव ई-सुविधा उपलब्ध करुन देणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच इतर विद्यापीठात चौकशी केली असता प्रति विद्यार्थी अंदाजे रू.५०/- प्रमाणे इतका खर्च अपेक्षित असल्याचे कळविले आहे. त्यानुसार प्रति विद्यार्थी रू.५० प्रमाणे X १५००० [विद्यार्थी संख्या]= रू.७,५०,०००/-इतका खर्च अपेक्षित आहे.

सबब, विद्यापीठाकडील बहि:स्थ विद्यार्थ्यांचे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रीया ऑनलाईन पध्दतीने करण्यास, खर्चास आणि महाराष्ट्र ज्ञान महामंडळ [एम.के.सी.एल.] यांच्या समवेत करार करणेची बाब विचारार्थ).

**ठराव: प्रस्तुत विद्यापीठाचे पदवी व पदव्युत्तर बहि:स्थ अभ्यासक्रम विद्यार्थ्याचे प्रवेश प्रकिया ऑनलाईन पध्दतीने करण्यास, खर्चास आणि महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एम. के. सी. एल.) यांच्या सोबत करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[२२(१४)] दि.२८/०४/२०१४ रोजीच्या बांधकाम समितीच्या सभेचा कार्यवृत्तांत मान्यतेस्तव सादर.**

(टिपणी:बांधकाम समितीची सभा दि.२८/०४/२०१४ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. या सभेच्या कार्यवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेची मान्यता स्टॅट्यूट क्रमांक ३३९ (f) ची तरतूद खालीलप्रमाणे आहे.

After the meeting, the minutes shall be drawn by the Member Secretary who shall get them approved from the Chairman. The recommendations of the Buildings and Works Committee shall be placed before the Management Council for its approval.

त्यानुसार दि.२८/०४/२०१४ रोजीचा बांधकाम समितीचा कार्यवृत्तांत विचारार्थ).

**ठराव: दि.२८/०४/२०१४ रोजीच्या बांधकाम समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[२२(१५)]** **श्री. शरद शंकर पवार, ७१८, उत्तर सदर बझार, सोलापूर यांनी दि.११/०४/२०१४ रोजीच्या अर्जान्वये दि.०४/११/२००९ पासून रूजू दिनांकापर्यंतचा संपूर्ण पगार वार्षिक वेतनवाढीसह देवून रुजू करुन घेण्याबाबत केलेली विनंती व विद्यापीठास स्वखुशीने रु.२,००,०००/- देण्यास तयार असल्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी : श्री. पवार यांनी दि.११/०४/२०१४ रोजीच्या अर्जान्वये, मा. पीठासन अधिकारी, विद्यापीठ व महाविद्यालये न्यायाधिकरण, पुणे व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निकालाच्या अनुषंगाने बडतर्फच्या दिनांकापासून रुजू दिनांकापर्यंत वेतन देण्याबाबत विनंती केली आहे तसेच त्यांनी विद्यापीठास स्वखुशीने रु.२,००,०००/- देण्यास तयार असल्याचे कळविले आहे.

श्री शरद शंकर पवार यांना रेकॉर्ड किपर- नि लिपिक या पदावरुन परिविक्षाधिन कालावधीत विद्यापीठ सेवेतून दि.०४/११/२००९ रोजी बडतर्फ करण्यात आले आहे. तद्नंतर मा. पीठासन अधिकारी, विद्यापीठ व महाविद्यालये न्यायाधिकरण, पुणे व मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केली व त्याचा निकाल श्री शरद शंकर पवार यांच्या बाजूने झालेला आहे. या याचिकेतील निर्णयाविरुध्द विद्यापीठाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे LPA दाखल केलेले असून ते प्रलंबित आहे.)

श्री. शरद शंकर पवार, ७१८, उत्तर सदर बझार, सोलापूर यांनी दि.११/०४/२०१४ रोजीच्या अर्जान्वये दि.०४/११/२००९ पासून रुजू दिनांकापर्यंतचा संपूर्ण पगार वार्षिक वेतनवाढीसह देवून रुजू करुन घेण्याबाबत केलेली विनंती व विद्यापीठास स्वखुशीने रु.२,००,०००/- देण्यास तयार असल्याची बाब विचारार्थ.

**ठराव:** **सदरचे प्रकरण मुंबई येथे न्यायप्रविष्ट असल्याने विषय मागे घेण्यात आला. यापुढे अशा प्रकारचे विषय व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्यात येवू नयेत असे सर्वानुमते ठरले.**

**[२२(१६)] विद्यापीठातील प्रशासकीय सेवकांना पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त असलेल्या पदावर पदोन्नती देण्याकरिता विभागीय पदोन्नती समितीने शिफारस केलेला कार्यवृत्तांत विचारार्थ.**

(टिपणीः विद्यापीठातील प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीकरिता गठीत करण्यात आलेल्या विभागीय पदोन्नती समितीची बैठक दि.२९/०४/२०१४ रोजी विद्यापीठ कार्यालयात आयोजीत करण्यात आली होती. उक्त विभागीय पदोन्नती समितीने दि.२६ ऑक्टोबर, २००४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार १ सप्टेंबर, २०१३ ते ३१ ऑगस्ट, २०१४ या कालावधीतील उमेदवाराची निवड यादी व प्रतीक्षा यादी तयार केलेली असून, सदर समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे.

**सबब, विद्यापीठातील प्रशासकीय सेवकांना पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त असलेल्या पदावर पदोन्नती देण्याकरिता विभागीय पदोन्नती समितीने शिफारस केलेला कार्यवृत्तांत विचारार्थ).**

**ठरावः विद्यापीठातील प्रशासकीय सेवकांना पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त असलेल्या पदावर पदोन्नती देण्याकरिता विभागीय पदोन्नती समितीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **सचिव** | **अध्यक्ष** |
| **व्यवस्थापन परिषद** | **व्यवस्थापन परिषद** |